निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
सोमवार
१२ जानेवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३१८ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

## पिशोर पोलिसांचा वाळू तस्करांना दणका; तीन ट्रॅक्टर जप्त, गुन्हे दाखल!

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/प्रतिनिधी**/पिशोर परिसरात अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीने हैदोस घातला असताना, पोलिसांनी धडक कारवाई करत तस्करांचे कंबरडे मोडले आहे. पिशोर पोलिसांनी वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून अवैध वाळू वाहतूक करणारे तीन ट्रॅक्टर पकडले असून, या कारवाईमुळे वाळू माफियांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे.





पळशी बु. शिवार: मध्यरात्री टाकला छापा पहिली कारवाई १७ तारखेला मध्यरात्री ३:१५ वाजता पळशी बु. शिवारात करण्यात आली. भगवान गायकवाड यांच्या शेताजवळ पोलिसांनी सापळा रचून सागर कारभारी जाधव व बापू देविदास नलावडे यांना 'स्वराज' ट्रॅक्टरसह (MH 20 GV 1754) रंगेहात पकडले. ६ लाखांचा ट्रॅक्टर, १ लाखाची ट्रॉली आणि त्यातील अवैध वाळू जप्त करण्यात आली आहे.

टाकळी शाहू रोडवर दुसरी कारवाई दुसरी कारवाई ७ तारखेला दुपारी २:२० वाजता टाकळी शाहू ते आडगाव रस्त्यावर करण्यात आली. भारत सुदाम गोराडे (रा. म्हसला, ता. सिल्लोड) याच्या ताब्यातील 'फॉर्मट्रेक' ट्रॅक्टर (MH 20 HB 4037) पोलिसांनी अडवला. विनापरवाना ७ लाख रुपये किमतीचा ट्रॅक्टर वाळू वाहतूक करताना आढळल्याने चालक भारत गोराडे व मालक सुदाम गोराडे यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

अपराजिता अग्निहोत्री यांच्या पथकाची गुप्त माहितीवरून कारवाई तिसरी मोठी कारवाई ९ तारखेला रात्री ८:४५ वाजता पळशी बु.येथील सोळंके वस्तीवर करण्यात आली. सहायक पोलीस अधीक्षक अपराजिता अग्निहोत्री यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार पिशोर पोलिसांनी छापा टाकला. येथे 'सोनालिका' कंपनीचा ट्रॅक्टर आणि ट्रॉली जप्त करण्यात आली. अंधाराचा फायदा घेऊन चालक फरार झाला असला तरी, मालक साईनाथ बाजीराव लोंढे (रा. रामनगर) व चालकावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह आणि सहायक पोलीस अधीक्षक अपराजिता अग्निहोत्री यांच्या मार्गदर्शनाखाली पिशोरचे प्रभारी स.पो.नि. शिवाजीराव नागवे व त्यांच्या पथकाने (विश्वजीत फरताडे, सखाराम सोनवणे, गंगाधर भताणे व इतर कर्मचारी) यशस्वी केली.

पोलिसांचा कडक इशारा अवैध वाळू उत्खननामुळे पर्यावरणाचे नुकसान करणाऱ्या आणि शासनाचा महसूल बुडवणाऱ्या तस्करांची आता खैर नाही. अशीच कठोर कारवाई यापुढेही सुरू राहणार असल्याचे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**- सुनील निकम, कन्नड ग्रामीण प्रतिनिधी.**

### शिवतीर्थावर ऐतिहासिक 'शिवगर्जना'

## २० वर्षांनंतर ठाकरे बंधू एकत्र; भाजप आणि महायुतीवर तोफ डागली!

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/** मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या राजकारणातील सर्वात मोठी आणि ऐतिहासिक घटना आज शिवतीर्थावर घडली. तब्बल २० वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर मनसे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे एकाच मंचावर आले. या संयुक्त सभेने केवळ शिवसैनिक आणि मनसैनिकांमध्येच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रात उत्साहाचे वातावरण निर्माण केले आहे.




'मुंबईचे बॉम्बे करण्याचा डाव' - उद्धव ठाकरेंचा गंभीर आरोप

सभेला संबोधित करताना उद्धव ठाकरे यांनी सत्ताधारी महायुतीवर आणि विशेषतः उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार प्रहार केला. ते म्हणाले:अडाणीकरण आणि मुंबईचे नाव: मुंबादेवीच्या नावावरून या शहराला 'मुंबई' हे नाव मिळाले आहे. मात्र, आता हे शहर उद्योजकांच्या घशात घालून त्याचे पुन्हा 'बॉम्बे' करण्याचा घाट घातला जात आहे. हे मुंबईचे 'अडाणीकरण' थांबवावे लागेल.

फडणवीसांना आव्हान: देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंना विकासावर बोलण्याचे आव्हान दिले होते. त्याला उत्तर देताना ठाकरे म्हणाले, मोदींपासून तुमच्या खालच्या चेल्या-चपाट्यांपर्यंत, कुणीही हिंदू-मुस्लिम मुद्द्याशिवाय केलेले एक भाषण दाखवा, आम्ही तुम्हाला १ लाख रुपये देऊ. आम्हाला तुमचा चोरीचा पैसा नको.

आम्ही अस्सल मराठी देशभक्त हिंदू!

ठाकरे बंधूंनी आपल्या भाषणाची सुरुवात आपापल्या शैलीत केली. राज ठाकरेंनी 'तमाम मराठी बांधवांनो' अशी साद घातली, तर उद्धव ठाकरेंनी 'तमाम हिंदू बांधवांनो' असे संबोधले. यावर भाष्य करताना उद्धव ठाकरे म्हणाले की, आम्ही अस्सल मराठी बोलणारे देशभक्त हिंदू आहोत.

आमच्यातील वाद गाडून आम्ही केवळ मुंबई आणि मराठी माणसाच्या अस्मितेसाठी एकत्र आलो आहोत.

राज ठाकरेंची मांडणी आणि शिवरायांचा वारसा

राज ठाकरे यांनी आपल्या भाषणात सत्ताधाऱ्यांच्या कारभाराचे वाभाडे काढले. त्यांच्या भाषणाचे कौतुक करताना उद्धव ठाकरे म्हणाले, राज यांनी आज उत्तम मांडणी केली. पण नुसतं पोटात तिडक असून चालणार नाही, ती डोक्यात गेली पाहिजे. तरच आपल्याला शिवरायांचे नाव घेण्याचा अधिकार आहे.

निवणुकीचे गणित आणि मुंबईचे महत्त्व

मुंबई महानगरपालिकेचे महत्त्व अधोरेखित करताना या सभेने राजकीय वातावरण तापवले आहे:बजेटचे महत्त्व: २०२५ मध्ये मुंबई महानगरपालिकेचे बजेट ७५ हजार कोटींच्या घरात गेले आहे, जे आशिया खंडातील सर्वात श्रीमंत महापालिका म्हणून ओळखले जाते.

अस्तित्वाची लढाई: हे ठाकरेंच्या अस्तित्वाची लढाई आहे का? या प्रश्नाला उत्तर देताना उद्धव ठाकरेंनी ठणकावून सांगितले की, आमचे अस्तित्व संपवणारे नेतृत्व अजून जन्माला यायचे आहे.

शिवसेना आणि ठाकरे कुटुंबाचे शिवतीर्थाशी (शिवाजी पार्क) भावनिक नाते आहे. २० वर्षांनंतर दोन्ही बंधू एकत्र आल्याने मैदानात शिवसैनिक आणि मनसैनिकांनी प्रचंड गर्दी केली होती. 'महाराष्ट्र धर्माची पताका' उंचावत एकत्र येण्याचे आवाहन राज ठाकरेंनी केले होत.

ज्याला मतदारांनी अभूतपूर्व प्रतिसाद दिला.ठाकरे बंधूंच्या या 'संयुक्त शिवगर्जनेमुळे' आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीत महायुतीसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. आता मुंबईचा मराठी मतदार या भावनिक सादेला आणि 'मुंबई वाचवा' या आवाहनाला कसा प्रतिसाद देतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

## पिंपरी-चिंचवडमध्ये पोलिसांचा मोठा 'ब्लंडर'!

**आत्ताच एक्सप्रेस**

**पुणे /प्रतिनिधी/** पिंपरी-चिंचवड शहरात आज राजकीय हायव्होल्टेज ड्रामा पाहायला मिळाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या रोड शोसाठी चक्क राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा ताफा १५ ते २० मिनिटे वाहतूक कोंडीत अडकून पडल्याची धक्कादायक घटना घडली. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या ढिसाळ नियोजनाचा फटका खुद्द उपमुख्यमंत्र्यांनाच बसल्याने पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या कार्यक्षमतेवर आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, उपमुख्यमंत्री अजित पवार हे इंद्रायणी नगर येथील सभा आटोपून भोसरीतील चक्रपाणी वसाहतीकडे निघाले होते. त्याच वेळी भोसरी परिसरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा रोड शो सुरू होता. मुख्यमंत्र्यांच्या सुरक्षेसाठी पोलिसांनी नाशिकहून भोसरीकडे जाणारी सर्व वाहतूक गणेश साम्राज्य चौकात रोखून धरली होती.अजित पवार यांचा अधिकृत दौरा पोलिसांकडे आधीच असतानाही, त्यांच्या ताफ्याला या कोंडीतून वाट करून देण्यात पोलीस अपयशी ठरले. परिणामी, राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांना भर उन्हात १५-२० मिनिटे गाडीत ताटकळत बसावे लागले. एकाच वेळी दोन व्हीव्हीआयपी (VVIP) शहरात असताना त्यांच्या हालचालींचे योग्य समन्वय राखण्यात पोलीस आयुक्तांचे दुर्लक्ष झाले का? असा सवाल आता राजकीय वर्तुळात विचारला जात आहे.

मुख्यमंत्र्यांचा पोलिसांवर संताप; 'दोरीचा वेढा' ठरला वादाचा मुद्दा

दुसरीकडे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे देखील पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराज झालेले पाहायला मिळाले. भोसरीतील रोड शो दरम्यान, पोलिसांनी मुख्यमंत्र्यांच्या रथाभोवती दोरीचा मजबूत वेढा घातला होता. मतदारांना रथाच्या जवळ येण्यापासून रोखण्यासाठी पोलिसांनी ही तटबंदी केली होती. मात्र, हे पाहून फडणवीस संतापले. मी मतदारांना साद घालायला आलो आहे, त्यांना माझ्यापासून दूर का ठेवताय? असा पवित्रा घेत त्यांनी पोलिसांना तात्काळ दोरीचा वेढा काढण्याचे आदेश दिले. पोलिसांच्या या अतिउत्साहामुळे मतदारांमध्ये चुकीचा संदेश जाईल, हे ओळखून मुख्यमंत्र्यांनी जाहीरपणे आपली नाराजी व्यक्त केली.

या गोंधळातच सुरक्षेचा आणखी एक गंभीर प्रश्न ऐरणीवर आला. मुख्यमंत्र्यांच्या स्वागतासाठी सुरू असलेल्या जोरदार फटाक्यांच्या आतिषबाजीमुळे एका इमारतीवरील मोबाईल टॉवरला भीषण आग लागली. स्काय शॉट्स थेट टॉवरवर पडल्याने ही आग लागल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत इतक्या मोठ्या प्रमाणात धोकादायक फटाके वाजत असताना पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाई का केली नाही? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

पोलीस आयुक्तांवर प्रश्नचिन्ह

एकाच दिवशी घडलेल्या या तीन प्रमुख घटनांनी पिंपरी-चिंचवड पोलीस प्रशासनाचे वाभाडे काढले आहेत: १. उपमुख्यमंत्र्यांचा ताफा अडकणे. २. मुख्यमंत्र्यांच्या संतापामुळे पोलिसांची नाचक्की होणे. ३. रोड शो दरम्यान लागलेली आग.पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी केवळ मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्याला प्राधान्य दिले की त्यांच्याकडून नियोजनात मोठी चूक झाली, याची चर्चा आता रंगली आहे. या सर्व प्रकारानंतर जबाबदार पोलीस अधिकाऱ्यांवर पोलीस आयुक्त कारवाई करण्याचं धाडस दाखवणार का? की याकडे दुर्लक्ष करणार? याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.



# शब्दांना 'पंख' देणारा महामानव : सर आयझॅक पिटमॅन

आजचे युग हे गतीचे युग आहे. तंत्रज्ञानाने मानवी संवादाला प्रकाशवेगाशी स्पर्धा करायला शिकवले आहे. पण जेव्हा डिजिटल क्रांतीचा विचारही कुणी केला नव्हता, अशा काळात मानवी विचारांच्या गतीला लेखणीच्या टोकावर पकडण्याचे सामर्थ्य ज्यांनी दिले, ते नाव म्हणजे सर आयझॅक पिटमॅन. लघुलिपीचे (डर्हीींहरपव) जनक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पिटमॅन यांची स्मृती केवळ एका लेखन पद्धतीपुरती मर्यादित नसून, ती मानवी कार्यक्षमता आणि प्रशासकीय शिस्तीच्या क्रांतीचे प्रतीक आहे.

इंग्लंडच्या मातीत जन्मलेल्या आयझॅक पिटमॅन यांनी मानवी ध्वनीचा सूक्ष्म अभ्यास केला. एखादा वक्ता ज्या वेगाने बोलतो, त्या वेगाने सामान्य लिपीत लिहिणे अशक्य असते. ही उणीव भरून काढण्यासाठी पिटमॅन यांनी भूमितीय रेषा आणि चिन्हांच्या आधारे 'फोनेटिक' (ध्वनीवर आधारित) लघुलिपी विकसित केली. ही केवळ एक लिपी नव्हती, तर ती आवाजाला चित्रात रूपांतरित करणारी कला होती. न्यायालयीन कामकाज असो वा संसदेतील भाषणे, प्रत्येक शब्द जसाच्या तसा टिपण्याची सोय पिटमॅन यांच्या संशोधनामुळे शक्य झाली.

पिटमॅन यांची लघुलिपी ही केवळ कार्यालयापुरती मर्यादित राहिली नाही, तर ती लाखो मध्यमवर्गीय तरुणांच्या प्रगतीचे साधन बनली. गेल्या काही दशकांचा इतिहास पाहिला, तर 'लघुलेखन आणि टंकलेखन' (Steno-Typing) हे कौशल्य रोजगाराची हमी देणारे सर्वात मोठे क्षेत्र होते.

रोजगार निर्मिती: अत्यल्प खर्चात आणि कमी वेळात आत्मसात करता येणाऱ्या या कौशल्याने सामान्य घरातील तरुणांना मंत्रालयापासून ते खाजगी कॉर्पोरेट कार्यालयांपर्यंत मानाची पदे मिळवून दिली.

प्रशासकीय कणा: कोणत्याही सक्षम प्रशासनाचा कणा हा अचूक नोंदी आणि त्वरित निर्णय प्रक्रिया असतो. लघुलिपीमुळे टिपणी (Notes) आणि इतिवृत्त (Minutes) लिहिण्याच्या कामाला जी गती मिळाली, ती आजही आधुनिक ईमेल आणि रेकॉर्डिंगच्या युगात पायाभूत मानली जाते.

केवळ वेग नव्हे, तर मूल्यांची जोपासना

आज आपण 'व्हॉइस-टू-टेक्स्ट' तंत्रज्ञान वापरतो, पण लघुलिपी शिकताना विद्यार्थ्यांमध्ये जे गुण विकसित होतात, त्याची तोड कशालाच नाही.

**एकाग्रता:** वक्त्याचा शब्द न शब्द ऐकण्यासाठी लागणारी कमालीची एकाग्रता.

**श्रवणशक्ती:** शब्दांमधील सूक्ष्म फरक ओळखण्याची क्षमता.

**अचूकता:** वेगाच्या नादात अर्थाचा अनर्थ होऊ नये म्हणून जपलेली शिस्त. पिटमॅन यांनी त्यांच्या संशोधनातून ही मानवी मूल्ये नकळतपणे समाजाला दिली.


आज लघुलिपीचे प्रमाण कमी झाले असले, तरी पिटमॅन यांनी दिलेला 'वेगाचा विचार' आजही डिजिटल साधनांच्या रूपात जिवंत आहे. त्यांच्या पुस्तकांच्या लाखो प्रतींची झालेली विक्री हे त्यांच्या जागतिक प्रभावाचे लक्षण आहे. ते केवळ संशोधक नव्हते, तर एक दूरदृष्टी असलेले शिक्षणतज्ज्ञ आणि प्रकाशकही होते.

सर आयझॅक पिटमॅन यांचे योगदान हे केवळ एका लिपीपुरते मर्यादित नाही, तर ते 'संधी' निर्माण करण्याच्या तत्त्वज्ञानाशी जोडलेले आहे. ज्या काळात शिक्षणाची साधने मर्यादित होती, त्या काळात त्यांनी सामान्य माणसाला सन्मानाने जगण्याचे साधन दिले. आजच्या डिजिटल झगमगाटात आपण मूळ कौशल्यांची कास सोडू नये, हीच त्यांच्या स्मृती दिनानिमित्त खरी शिकवण ठरेल. शब्दांना वेग देणाऱ्या आणि विचारांना शिस्त लावणाऱ्या या महान विचारवंतास विनम्र अभिवादन!

# श्री गुरु गणेश तीर्थ दर्शन पदयात्रेचे सलग १९ व्या वर्षी आयोजन; १६ जानेवारीपासून छ. संभाजीनगर ते जालना पायी वारी

**आत्ताच एक्सप्रेस छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी**/ कर्नाटक गजकेशरी प.पू. गणेशलालजी म.सा. यांच्या ६४ व्या पुण्यतिथीचे औचित्य साधून, परमेष्ठी परिवारातर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही छ. संभाजीनगर ते जालना पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. सलग १९ व्या वर्षी निघणारी ही पदयात्रा १६ जानेवारी ते १८ जानेवारी २०२६ या कालावधीत संपन्न होणार आहे.

ग्यानगंगोत्री प.पू. प्रभाकरवरजी म.सा. यांच्या सुशिष्या महाराष्ट्र प्रवर्तीनी प.पू. प्रकाशकवरजी म.सा. यांच्या प्रेरणेतून सुरू झालेली ही परंपरा आजही तितक्याच भक्तीभावाने जोपासली जात आहे.



१६ जानेवारी (प्रारंभ): सकाळी ५:३० वाजता महावीर भवन, कुंभारवाडा (औरंगपुरा) येथून शोभायात्रेने प्रारंभ होईल. गुलमंडी, राजाबाजार, मोंढा नाका मार्गे सकाळी ८:०० वाजता चिकलठाणा येथे पोहचेल. दुपारी १:०० वाजता करमाड येथे भोजन व विश्रांती होईल. रात्रीचा मुक्काम शेकटा येथे असेल, जिथे रतनचंदजी संकलेचा परिवारातर्फे व्यवस्था करण्यात आली आहे.

१७ जानेवारी: सकाळी ६:०० वाजता शेकटा येथून बदनापूरकडे प्रस्थान. दावलवाडी येथे दुपारचे भोजन होऊन पदयात्रा जालना येथील जैन इंग्लिश स्कूल मध्ये पोहचेल. येथे भाविकांचा सत्कार समारंभ व मुक्काम असेल.१८ जानेवारी: सकाळी जालना शहरातील मुख्य मार्गावरून गुरु गणेशलालजी महाराजांच्या जयघोषात पदयात्रा गुरु गणेश नगर (जैन गौशाला) या समाधी स्थळी पोहचेल. दुपारी १:३० वाजता भाविकांच्या परतीसाठी बसची व्यवस्था करण्यात आली आहे.

जालना येथील शिवाजी चौक येथे प.पू. गणेशलालजी म.सा. यांचे समाधी स्थळ आहे. अमावस्येच्या दिवशी त्यांचे समाधी मरण झाले होते, त्यामुळे जैन धर्मात या दिवशी समाधी दर्शनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. १८ जानेवारी रोजी होणाऱ्या मुख्य कार्यक्रमास श्रुतमुनी म.सा., सौरवमुनी म.सा., गौरवमुनी म.सा., अक्षरमुनी म.सा., प्रतिभाकवरजी म.सा., किरण सुधाजी म.सा. यांच्यासह अनेक साधू-संतांची पावन उपस्थिती लाभणार आहे.

व्यवस्था: ५०० ते ६०० भाविकांच्या राहण्याची, भोजनाची आणि गरम पाण्याची (एकासना, आयबिलसाठी) संपूर्ण सोय परमेष्ठी परिवारातर्फे करण्यात आली आहे.

आरोग्य: यात्रेदरम्यान डॉक्टरांचे पथक आणि रुग्णवाहिका सोबत तैनात असेल.

ड्रेस कोड: सहभागी पुरुषांनी पांढरे वस्त्र आणि महिलांनी लाल किंवा केशरी वस्त्र परिधान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

यावर्षी पदयात्रेकरूंची संख्या मर्यादित असल्याने इच्छुकांनी आपली नावे रतन इलेक्ट्रीकल, किराण चावडी किंवा वर्धमान स्टेशनर्स, दशमेशनगर येथे नोंदवावीत. १६ जानेवारी रोजी सकाळी ५:०० वाजता जास्तीत जास्त भाविकांनी महावीर भवन येथे उपस्थित राहावे, असे आवाहन परमेष्ठी परिवाराचे प्रितेश बोरा, संतोष बोरा, पारस कात्रेला, विनोद कुंकूलोळ, पंकज संचेती, हितेंद्र चोरडिया, संदिप सुराणा आणि समस्त परमेष्ठी युवा ग्रुपने केले आहे.

### लासूर स्टेशन येथे महाराष्ट्र अंनिसच्या अध्यक्षपदी किशोर पवार यांची निवड

**आत्ताच एक्सप्रेस लासूर स्टेशन (प्रतिनिधी)**:गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथे 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती'ची (अंनिस) नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. बुधवार, दि. ७ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या बैठकीत अध्यक्षपदी किशोर बाबुराव पवार तर उपाध्यक्षपदी मच्छिंद्र तुकाराम पानकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.कार्यक्रमाची रूपरेषाकार्यक्रमाची सुरुवात चळवळीच्या स्फूर्तिगीताने करण्यात आली. या प्रसंगी भास्कर बनसोडे सर यांनी प्रास्ताविक मांडले, ज्यामध्ये त्यांनी समितीच्या कार्याची गरज आणि पुढील वाटचालीबद्दल सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मच्छिंद्र पानकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार मच्छिंद्र बडोगे सर यांनी मानले.नूतन कार्यकारिणी खालीलप्रमाणे:समितीच्या विविध विभागांची जबाबदारी समर्थपणे पेलण्यासाठी खालीलप्रमाणे निवडी करण्यात आल्या आहेत:पदनावअध्यक्षकिशोर बाबुराव पवारउपाध्यक्षमच्छिंद्र तुकाराम पानकरकार्याध्यक्षभास्कर गोपीनाथ बनसोडेप्रधान सचिवजगजीवन सातदिवेपर्यावरण विभाग कार्यवाहप्रशांत एकनाथ दाभाडेसांस्कृतिक कार्यवाहमच्छिंद्र कारभारी .

## मकरसंक्रांत;आनंदाचा पर्व

मकरसंक्रांत दरवर्षी येते.आनंद घेवुन.तीळगुळ देवुन तीळगुळ घ्या गोडगोड बोला म्हणत आपण तिचं स्वागत करीत असतो.नव्हे तर हा आनंदाचा पर्वही साजरा करीत असतो.पण काही उचाट मंडळी या तीळसंक्रातीला गालबोट लावुन तीळसंक्रात फलाण्या गोष्टीवर आली असे उगाच बडबडत असतात.

तीळसंक्रात आनंदाचा पर्व आहे.या दिवशी लोक आपल्या अंघोळीच्या पाण्यात तीळ टाकून त्या पाण्याने अंघोळ करीत असतात. तसेच जेवणासाठी जे ही पदार्थ बनवतात.त्या सर्व पदार्थात तीळ टाकतात.याचा अर्थ असा आहे की या तीळ टाकल्याने रोगप्रतिकार शक्ती तर वाढतेच.शिवाय तीळामुळे शरीरातील थंडीने निर्माण झालेली उर्जा भरुन निघते.मृत्यु हे आपल्या जीवनातील अंतिम सत्य आहे.या मृत्युने प्राणीपक्षी,व वृक्षलता यांनाही सोडलेले नाही.जर माणुस मेलाच नाही तर नवीन जीव जन्माला कसा येणार? मग तो तीळसंक्रातीचा दिवस का असेना......माणसाने गावात सकाळी एखादा जीव मेलेला पाहिला रे पाहिला की बस झालं.तीळसंक्रात त्यावर गेली असे संगळे मंडळ मानते.खरं तर या दिवसापासुन सुर्य आपली दिशा बदलवत असतो.म्हणुन या दिवसाला महत्व आहे. तीळसंक्रातीचा गोडवा वर्षभर येत नसल्याने तीळसंक्रातीला तीळगुळ वाटल्यास वर्षभर माणुस गोडच बोलतो असाही एक भ्रामक समज.पण तसे काहीच नाही.माणसाच्या जीवनात जे दुःख असतं.ते दुःख एक दिवस तरी भासु नये.तसेच एक दिवस तरी आनंद मिळावा या उद्देशाने या दिवसालाच नाही तर सणांना पुजण्याची गरज आहे.निदान लोकांमधील शत्रुत्व कमी व्हावं,देवाबद्दलची आस्था जास्त व्हावी या उदात्त हेतुने असे पर्व आम्ही दरवर्षी साजरे करतो.करायलाही हवेत.तीळगुळ आपल्या शत्रुंनाही द्यायला हवा.आपले शत्रुही आपले मित्र असतात.तुम्ही खरंच शत्रुवर प्रेम करा.शत्रु आपला दूरचा मित्रच असतो.त्याच्या वाईट बोलण्याने आपण सावध होतो.धोका फक्त फितुरांमुळे होतो.आपलाच माणुस आपल्या पोटात केव्हा खंजर टाकेल ते सांगता येत नाही.

**- अंकुश शिंगाडे**

## छत्रपती संभाजीनगरच्या शिरपेचात मानाचा तुरा; शिवराज बोराडेची महाराष्ट्र सब-ज्युनिअर सॉफ्टबॉल संघात निवड

**आत्ताच एक्सप्रेस छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी**/आर्य चाणक्य विद्याधाम (जटवाडा) चा विद्यार्थी आणि छत्रपती संभाजीनगर जिल्हा सॉफ्टबॉल अकॅडमीचा उदयोन्मुख खेळाडू शिवराज संदीप बोराडे याची महाराष्ट्र राज्य सब-ज्युनिअर सॉफ्टबॉल मुलांच्या संघात निवड झाली आहे.

शिवराज आता हरियाणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे.राज्यातील चमकदार कामगिरीची पावती

नुकत्याच धुळे येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय सॉफ्टबॉल स्पर्धेत शिवराजने अष्टपैलू आणि उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले होते. त्याच्या या कामगिरीची दखल घेत निवड समितीने त्याची नॅशनल सब-ज्युनिअर सॉफ्टबॉल चॅम्पियनशिपसाठी निवड केली आहे.

ही स्पर्धा दि. ९ ते १२ जानेवारी २०२६ या कालावधीत झज्जर, हरियाणा येथे आयोजित करण्यात आली आहे.

शिवराज हा छत्रपती संभाजीनगर सॉफ्टबॉल अकॅडमी येथे नियमित सराव करतो.




त्याला या प्रवासात: पांडुरंग कदम (क्रीडा शिक्षक) ,गणेश बेटूदे (राष्ट्रीय प्रशिक्षक), संतोष आवचार (NIS प्रशिक्षक) यांचे मोलाचे तांत्रिक मार्गदर्शन लाभत आहे.शिवराजच्या या यशाबद्दल जिल्हा सॉफ्टबॉल संघटनेचे अध्यक्ष डॉ. दत्ताभाऊ पाथ्रीकर, उपाध्यक्ष डॉ. फुलचंद सलामपुरे, सचिव गोकुळ तांदळे, डॉ. उदय डोंगरे, दीपक रुईकर आणि क्रीडा अधिकारी अक्षय बिरादर यांनी त्याचे अभिनंदन केले आहे. तसेच, पोलीस उपनिरीक्षक सागर रुपवते, संस्थेचे कार्यवाह वामनराव देशपांडे, मुख्याध्यापक किशोर कुलकर्णी, उपमुख्याध्यापक शिवकुमार यन्नावार, रफीक जमादार, सचिन बोर्डे, भीमा मोरे आदींनीही शिवराजला राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक पटकावण्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## वंचित बहुजन आघाडीच्या नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्षपदी शंकर महाजन यांची निवड

**आत्ताच एक्सप्रेस देगलूर/प्रतिनिधी/** वंचित बहुजन आघाडीने आगामी काळातील संघटन मजबुतीसाठी आपली नवी कार्यकारणी जाहीर केली असून, यामध्ये बिलोली तालुक्यातील सगरोळी येथील डॅशिंग व्यक्तिमत्व आणि आक्रमक नेते शंकर गंगाधर महाजन यांची नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. पक्षाच्या प्रदेश कार्यालयाकडून त्यांना निवडीचे अधिकृत पत्र प्रदान करण्यात आले असून, या निवडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह दिसून येत आहे.

निष्ठेचे फळ: महाजन यांचा राजकीय प्रवास

शंकर महाजन हे सध्या सगरोळी ग्रामपंचायतीचे सदस्य म्हणून कार्यरत आहेत. गेल्या पाच वर्षांपासून त्यांनी ड. प्रकाश आंबेडकर (बाळासाहेब) यांच्या नेतृत्वाखाली अत्यंत निष्ठेने पक्षाचे काम केले आहे. यापूर्वी त्यांनी जिल्हा उपाध्यक्ष म्हणून आपली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली होती. गोरगरिबांच्या प्रश्नांवर सतत आवाज उठवणारे आणि सामान्यांसाठी सदैव तत्पर असणारे नेते म्हणून त्यांची ओळख आहे.

त्यांच्या याच निष्ठेची दखल घेत पक्षाने त्यांच्याकडे आता जिल्हाध्यक्षपदाची मोठी जबाबदारी सोपवली आहे.

**अशी आहे नवनिर्वाचित जिल्हा कार्यकारणी**

नांदेड दक्षिणच्या या नवीन कार्यकारणीत महाजन यांच्यासोबतच इतर अनुभवी पदाधिकाऱ्यांनाही स्थान देण्यात आले आहे:

महासचिव: रवी पंडित

उपाध्यक्ष: गणपत सवईसोनकांबळे, विनायक गजभारे, विद्यानंद पवळे, अरुण भद्रे, पवन कांबळे

सचिव: रंगनाथ गजले

संघटक: सुशील कुमार देगलूरकर (माजी नगरसेवक, देगलूर), संजय टिके

सल्लागार: डॉ. रामचंद्र वनंजे, भगवानराव हनमंते

कायदेशीर सल्लागार: ड. जयपाल ढवळे

प्रसिद्धीप्रमुख: नामदेव पांचाळ

सदस्य: गौतम डुमणे, प्रकाश कोल्हे, रत्नपाल माने

सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव

शंकर महाजन यांची जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल माजी जिल्हाध्यक्ष शिवा नरंगले, प्रशांत इंगोले आणि श्याम कांबळे यांच्यासह जिल्ह्यातील अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

पक्षाने एका निष्ठावान कार्यकर्त्याचा योग्य सन्मान केला आहे, अशा भावना यावेळी समर्थकांनी व्यक्त केल्या. आगामी काळात वंचित बहुजन आघाडीची पाळेमुळे जिल्ह्यात अधिक घट्ट करण्यासाठी आपण कटीबद्ध असल्याचे महाजन यांनी निवडीनंतर सांगितले.

# युवाशक्तीचे राष्ट्रनिर्माण आणि समाजपरिवर्तनातील स्थान

१२ जानेवारी हा दिवस भारतात 'राष्ट्रीय युवा दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ स्वामी विवेकानंदांच्या जयंतीचा स्मरणोत्सव नसून तो भारतीय युवकांच्या आत्मभानाचा, सामाजिक जबाबदारीचा आणि राष्ट्रनिर्मितीच्या ध्येयाचा वैचारिक उत्सव आहे. विवेकानंदांनी युवकांना केवळ उद्याचे नागरिक म्हणून पाहिले नाही, तर आजच्या समाजाचे निर्णायक शिल्पकार म्हणून ओळखले. समाजशास्त्रीय दृष्टीने युवक हा कोणत्याही समाजातील सर्वाधिक गतिमान, सर्जनशील आणि परिवर्तनक्षम घटक असतो. सामाजिक रूढी, परंपरा, अन्याय आणि विषमता यांना प्रश्न विचारण्याची ताकद युवकांमध्येच असते. म्हणूनच राष्ट्रीय युवा दिन हा दिवस युवकांच्या ऊर्जेला योग्य दिशेने वळवण्याचा आणि समाजाला आत्मपरीक्षण करण्यास प्रवृत्त करणारा ठरतो.

भारतीय समाजाची लोकसंख्यात्मक रचना पाहिली तर आपण युवकप्रधान राष्ट्र आहोत. देशातील मोठा हिस्सा १५ ते ३५ वयोगटातील आहे. हे वास्तव भारतासाठी सुवर्णसंधी असली तरी त्याचबरोबर मोठे सामाजिक आव्हानही आहे. योग्य शिक्षण, कौशल्य, आरोग्य आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्यास ही युवकसंख्या राष्ट्राच्या आर्थिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक प्रगतीचा कणा ठरू शकते. परंतु समाजशास्त्र सांगते की संधींचे असमान वितरण, वर्गभेद, जातीय विषमता, ग्रामीण-शहरी दरी आणि लिंगाधारित भेदभाव युवकांच्या क्षमतेला मर्यादा घालतात. आजही मोठ्या प्रमाणावर युवक बेरोजगारी, अल्परोजगार आणि अस्थिर कामाच्या विळख्यात अडकलेले आहेत. शिक्षण असूनही सन्मानजनक रोजगार न मिळाल्याने युवकांमध्ये निराशा, असंतोष आणि सामाजिक तणाव वाढत आहे. हा असंतोष वैयक्तिक अपयशाचा नव्हे, तर सामाजिक-आर्थिक रचनेतील अपुरेपणाचा परिणाम आहे.

स्वामी विवेकानंदांनी युवकांना आत्मविश्वास, स्वाभिमान आणि ध्येयवादाचा संदेश दिला. उठा, जागे व्हा आणि ध्येय साध्य होईपर्यंत थांबू नका हा त्यांचा मंत्र आजच्या अस्थिर आणि स्पर्धात्मक जगात अधिकच अर्थपूर्ण ठरतो. डिजिटल माध्यमांच्या युगात युवक सतत तुलना, प्रसिद्धी आणि बाह्य यशाच्या दबावाखाली जगत आहेत. सोशल मीडियावर निर्माण होणाऱ्या आभासी प्रतिमा अनेकांना न्यूनगंड, एकाकीपणा आणि नैराश्याकडे ढकलतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून हे 'ओळखीचे संकट' आहे, जिथे व्यक्ती स्वतःचे मूल्य समाजाने ठरवलेल्या निकषांवर मोजते. विवेकानंदांचा आत्मसन्मानाचा विचार युवकांना अंतर्गत सामर्थ्यावर उभे राहण्याची प्रेरणा देतो, जी सामाजिक सशक्तीकरणासाठी अत्यावश्यक आहे.

शिक्षण हा युवकांच्या सामाजिक उन्नतीचा कणा आहे. परंतु आजचे शिक्षण बहुतेक वेळा केवळ बाजारपेठेच्या गरजांपुरते मर्यादित राहिले आहे. पदवी, गुण आणि प्रमाणपत्रे मिळतात, पण सामाजिक भान, नैतिकता आणि नागरिकत्वाची जाणीव दुर्लक्षित राहते. विवेकानंदांनी शिक्षणाला 'चरित्रनिर्मिती' असे संबोधले होते. समाजशास्त्रीयदृष्ट्या पाहिले तर शिक्षित पण सामाजिकदृष्ट्या असंवेदनशील युवक समाजासाठी घातक ठरू शकतो. शिक्षणाने युवकांना केवळ रोजगारासाठी नव्हे, तर जबाबदार नागरिक म्हणून घडवले पाहिजे, जे अन्याय, भेदभाव आणि शोषणाविरुद्ध उभे राहतील. शिक्षणातून वैज्ञानिक दृष्टिकोन, लोकशाही मूल्ये आणि सामाजिक न्यायाची जाणीव निर्माण होणे आवश्यक आहे.

जागतिकीकरण, खाजगीकरण आणि तंत्रज्ञानामुळे युवकांच्या आयुष्यात मोठे बदल घडले आहेत. एकीकडे नव्या संधी, माहिती आणि जागतिक संपर्क उपलब्ध झाले आहेत, तर दुसरीकडे अस्थिर रोजगार, स्थलांतर, कौटुंबिक ताण आणि मानसिक असुरक्षितता वाढली आहे. ग्रामीण युवक शेतीतील अनिश्चित उत्पन्न आणि नैसर्गिक आपत्तींच्या धोक्यामुळे शहरांकडे स्थलांतर करतात, परंतु शहरांमध्येही त्यांना सन्मानजनक जीवन, सुरक्षित काम आणि सामाजिक आधार हमखास मिळेलच असे नाही. समाजशास्त्र सांगते की जेव्हा युवकांच्या अपेक्षा आणि वास्तव यातील दरी वाढते, तेव्हा सामाजिक तणाव, आंदोलन आणि अस्थिरता निर्माण होते. त्यामुळे युवकांच्या समस्यांकडे वैयक्तिक नव्हे, तर संरचनात्मक दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे.

लोकशाहीमध्ये युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. युवक हे मतदार, कार्यकर्ते, स्वयंसेवक आणि विचारवंत म्हणून लोकशाहीला ऊर्जा देतात. परंतु आज अनेक युवक राजकारणापासून दूर राहतात, कारण त्यांना राजकीय व्यवस्था भ्रष्ट, गुंतागुंतीची आणि सामान्य माणसापासून दूर वाटते. विवेकानंदांनी मात्र सामाजिक आणि राष्ट्रीय प्रश्नांवर सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. त्यांच्या मते राष्ट्र म्हणजे केवळ भौगोलिक रचना नसून लोकांचे जिवंत संघटन आहे. युवक जेव्हा सामाजिक अन्याय, भ्रष्टाचार, पर्यावरणीय संकटे आणि मानवी हक्कांच्या उल्लंघनाविरुद्ध आवाज उठवतात, तेव्हाच लोकशाही सशक्त होते आणि राज्यसत्ता अधिक उत्तरदायी बनते.

स्त्री-पुरुष समानता, जातीय समता आणि सामाजिक न्याय या मूल्यांशिवाय युवकांचे सशक्तीकरण अपूर्ण आहे. आजही अनेक तरुणी शिक्षण, रोजगार आणि सार्वजनिक आयुष्यात भेदभावाचा सामना करतात. बालविवाह, लैंगिक हिंसा, कामाच्या ठिकाणी असमानता आणि प्रतिनिधित्वाचा अभाव या समस्या युवकवयातच त्यांच्या प्रगतीला मर्यादा घालतात. विवेकानंदांनी स्त्रीला राष्ट्राची शक्ती मानले. समाजशास्त्रीयदृष्ट्या पाहिले तर जे समाज आपल्या स्त्रियांना संधी देतात, तेच समाज प्रगत होतात. युवकांनी लिंगभाव, जात आणि वर्गाच्या पलीकडे जाऊन समतेचा स्वीकार करणे हीच खरी सामाजिक क्रांती आहे.जातव्यवस्था, आदिवासी व दलितांचे प्रश्न, अल्पसंख्याकांचे हक्क आणि प्रादेशिक असमतोल या भारतीय समाजातील दीर्घकालीन समस्या आहेत. युवक जर या प्रश्नांकडे उदासीन राहिले, तर अन्याय टिकून राहतो. परंतु युवक जागरूक झाले, तर सामाजिक बदल शक्य होतो. विवेकानंदांनी मानवतेवर आधारित राष्ट्रवादाचा पुरस्कार केला, जो सर्वांना समान संधी आणि सन्मान देणारा आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून युवकांनी बहुसांस्कृतिकता, सहअस्तित्व आणि सामाजिक सलोखा यांची कास धरली पाहिजे.तंत्रज्ञान आणि माध्यमांनी युवकांच्या विचारविश्वाला नवे आयाम दिले आहेत. माहितीच्या महासागरात वावरताना सत्य आणि असत्य, ज्ञान आणि प्रचार यातील फरक ओळखणे अत्यंत महत्त्वाचे झाले आहे. विवेकानंदांनी विवेकबुद्धी आणि चिंतनशीलतेवर भर दिला. आजच्या युवकांनीही तंत्रज्ञानाचा उपयोग शिक्षण, संशोधन, समाजसेवा आणि लोकशाही सशक्त करण्यासाठी करणे गरजेचे आहे, अन्यथा तेच तंत्रज्ञान द्वेष, अफवा आणि विभाजन पसरवण्याचे साधन ठरू शकते.

पर्यावरणीय संकट, हवामान बदल, जलसंकट आणि जैवविविधतेचा ऱ्हास हे आजच्या युवकांसमोर उभे असलेले मोठे आव्हान आहे. भविष्यातील पिढ्यांचे हक्क जपण्यासाठी युवकांनी शाश्वत विकासाची भूमिका स्वीकारणे आवश्यक आहे. विवेकानंदांनी निसर्गाशी सुसंवाद साधण्याचा विचार मांडला होता. समाजशास्त्रीयदृष्ट्या पाहिले तर पर्यावरणीय न्याय आणि सामाजिक न्याय हे एकमेकांशी जोडलेले आहेत. गरीब आणि वंचित समुदायांवर पर्यावरणीय ऱ्हासाचा सर्वाधिक परिणाम होतो, त्यामुळे युवकांनी या प्रश्नांवर संवेदनशील असणे गरजेचे आहे.

राष्ट्रीय युवा दिन हा केवळ उत्सवाचा नव्हे, तर आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. आपण आपल्या युवकांना केवळ स्पर्धात्मक यशासाठी घडवत आहोत की त्यांना संवेदनशील, जबाबदार आणि सामाजिकदृष्ट्या जागरूक नागरिक बनवत आहोत, हा प्रश्न विचारण्याची ही वेळ आहे. विवेकानंदांचे स्वप्न असे युवक घडवण्याचे होते जे स्वतःसाठीच नव्हे, तर समाजासाठी जगतील. आजच्या भारताला अशाच युवकांची गरज आहे जे विज्ञान, तंत्रज्ञान आणि आधुनिकतेसोबत करुणा, समता आणि मानवतावाद यांची सांगड घालतील.

अखेर, युवक हीच राष्ट्राची खरी संपत्ती आहे. त्यांची ऊर्जा, सर्जनशीलता आणि परिवर्तनाची आस हीच समाजाला पुढे नेते. राष्ट्रीय युवा दिनानिमित्त आपण स्वामी विवेकानंदांच्या विचारांकडे केवळ गौरवाने पाहू नये, तर ते आपल्या शिक्षणात, कामात आणि सामाजिक जीवनात उतरवावेत. कारण जेव्हा युवक स्वतःला बदलतो, तेव्हाच समाज बदलतो; आणि जेव्हा समाज बदलतो, तेव्हाच भारत देश खऱ्या अर्थाने समताधिष्ठित, सशक्त आणि प्रगत राष्ट्र म्हणून उभा राहू शकतो.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

## संक्षिप्त

### छत्रपती संभाजीनगर जिल्हा ज्युनिअर सॉफ्टबॉल निवड चाचणी १४ जानेवारीला

**अक्कलकोट राज्यस्तरीय स्पर्धेसाठी होणार निवड**



**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**/छत्रपती संभाजीनगर जिल्हा सॉफ्टबॉल असोसिएशनच्या वतीने ज्युनिअर मुले व मुलींच्या जिल्हा संघाची निवड चाचणी बुधवार, दिनांक १४ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे. ही चाचणी सायंकाळी ४ वाजता विभागीय क्रीडा संकुल, गारखेडा येथे पार पडणार आहे.

या जिल्हास्तरीय निवड चाचणीतून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची निवड छत्रपती संभाजीनगरच्या जिल्हा संघात केली जाईल. निवड झालेले खेळाडू अक्कलकोट (सोलापूर) येथे दि. १९ ते २१ जानेवारी २०२६ या कालावधीत होणाऱ्या ज्युनिअर मुले-मुली राज्यस्तरीय अजिंक्यपद सॉफ्टबॉल स्पर्धेत जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील.या निवड चाचणीत सहभागी होण्यासाठी खालील अटी व कागदपत्रे अनिवार्य आहेत.

**वयोमर्यादाः** खेळाडूंचा जन्म १ जानेवारी २००८ किंवा त्यानंतरचा असावा.

**आवश्यक कागदपत्रेः** आधार कार्डची छायांकित प्रत (झेरॉक्स) आणि पासपोर्ट आकाराचे फोटो सोबत आणणे बंधनकारक आहे.

**क्रीडा साहित्यः** खेळाडूंनी निवड चाचणीसाठी लागणाऱ्या आवश्यक क्रीडा साहित्यासह (उदा. किट, शूज इ.) वेळेवर उपस्थित राहावे.जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी या संधीचा लाभ घ्यावा आणि निवड चाचणीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सॉफ्टबॉल संघटनेचे अध्यक्ष डॉ. दत्ताभाऊ पाथ्रीकर, उपाध्यक्ष फुलचंद सलामपुरे आणि सचिव गोकुळ तांदळे यांनी केले आहे.

### जनगणनेच्या कामात सक्रीय सहभाग नोंदवावा- जिल्हाधिकारी स्वामी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** जनगणना हे राष्ट्रीय कार्य आहे. जनकल्याणाच्या विविध योजना राबवितांना जनगणनेमुळे प्राप्त माहितीचा वापर केला जातो. अशा या जनगणनेचे काम हे कर्तव्य भावनेने करावे व आपला सक्रीय सहभाग नोंदवावा,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांना केले.जनगणना २०२७ अंतर्गत आज जिल्हाधिकारी कार्यालयात जनगणना कर्मचाऱ्यांचे घरयादी गणना करुन गट तयार करण्याबाबत प्रशिक्षण पार पडले.

जिल्हाधिकारी कार्यालय, विविध शासकीय कार्यालये, नगरपालिका, तहसिल कार्यालये येथील कर्मचाऱ्यांनी यात सहभाग घेतला.

निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी सामान्य संगिता राठोड, प्रशिक्षण देण्यासाठी आलेले जनगणना संचालनालयाचे सहा.संचालक प्रवीण भगत, जनगणना निरीक्षक अरुण साळगावकर, तज्ज्ञ व्यक्ती रामदास मंडाले आदी उपस्थित होते.

जनगणना २०२७ ही दोन टप्प्यात होत आहे. त्याती पहिला टप्पा घराची यादी तयार करुन त्याचे गट तयार करणे हा असून हा टप्पा एप्रिल ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत पार पाडला जाईल. त्यानंतर प्रत्यक्ष जनगणना फेब्रुवारी २०२७ मध्ये सुरु होईल. यंदाच्या जनगणनेचे वैशिष्ट्य म्हणजे ही जनगणना ही संपूर्ण डिजीटल असेल. त्यात स्वगणनेचे म्हणजेच स्वतः नागरिकांना आपली माहिती ऑनलाईन भरता येणार आहे. त्यासाठी स्वतंत्र ओळखक्रमांक (आयडी) तयार होणार आहे. अर्थात ही भरलेली माहिती स्वतः जनगणना कर्मचारी येऊन पडताळणी ही करतील, अशी माहिती यावेळी देण्यात आली.जिल्हाधिकारी कार्यालयातील श्रीमती उर्मिला धारुरकर यांनी सूत्रसंचालन केले.

# फुलंब्रीत चोरट्यांचा धुमाकूळः इंजिनिअरिंग वर्कशॉप फोडण्याचा प्रयत्न फसला

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री (प्रतिनिधी)** फुलंब्री शहरात अज्ञात चोरट्यांच्या टोळीने पुन्हा एकदा डोके वर काढले असून, आज पहाटे नॅशनल इंजिनिअरिंग वर्कशॉप येथे चोरीचा धाडसी प्रयत्न करण्यात आला. मात्र, परिसरातील एका जागरूक नागरिकाने दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे मोठी चोरी टळली असून चोरट्यांना रिकाम्या हाताने पळ काढावा लागला.

**नागरिक जागे झाल्याने चोरटे पसार**

नेमकी घटना काय?

आज पहाटे ३ वाजेच्या सुमारास, फुलंब्री शहरातील न्यू सोहेल मेडिकलजवळ आणि सलीम कॉलनीसमोर असलेल्या नॅशनल इंजिनिअरिंग वर्कशॉपसमोर एक पांढऱ्या रंगाची टाटा इंडिका व्हिस्टा कार येऊन थांबली.नियोजित कटः चोरट्यांनी आपली गाडी रिव्हर्समध्ये दुकानाच्या शटरजवळ उभी केली, जेणेकरून चोरीचे साहित्य लवकर गाडीत भरता येईल.

उउढत तोडण्याचा प्रयत्नः गाडीतून उतरलेल्या दोन इसमांपैकी एकाने दुकानाबाहेर असलेला सीसीटीव्ही कॅमेरा पाहिला. कॅमेरा दिसताच त्याने आपल्या साथीदाराला इशारा केला. त्यानंतर एकाने खाली बसून कॅमेरा तोडण्याचा प्रयत्न केला, तर दोघांनी मिळून शटर उचकटण्यास सुरुवात केली.

नागरिकाची सतर्कता आली कामी

ज्यावेळी चोरटे शटर फोडण्यात व्यस्त होते, त्याचवेळी समोरील इमारतीमधील एका नागरिकाला संशयास्पद हालचाल जाणवली. त्यांनी खिडकीतून बाहेर पाहिले असता चोरीचा प्रकार सुरू असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी कोणताही उशीर न करता मोठ्याने आरडाओरडा करण्यास सुरुवात केली. लोकांच्या आवाजामुळे घाबरलेल्या चोरट्यांनी तात्काळ आपली गाडी काढली आणि अंधाराचा फायदा घेत तिथून पळ काढला.

त्यानंतर संबंधित नागरिकाने वर्कशॉपचे मालक आणि पोलिसांना या घटनेची माहिती दिली.वाइंडिंग आणि इंजिनिअरिंग दुकाने चोरट्यांच्या 'रडार'वर फुलंब्री परिसरात गेल्या काही दिवसांपासून चोरीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. विशेषतः वाइंडिंग आणि इंजिनिअरिंग वर्कशॉप्सना लक्ष्य केले जात आहे:सुमारे २०-२५ दिवसांपूर्वी खुलताबाद रोडवरील एका इंजिनिअरिंग वर्कशॉपमध्ये अशीच चोरी झाली होती.

परिसरातील विहिरींवरील पाण्याच्या मोटारी चोरीला जाण्याचे प्रमाणही प्रचंड वाढले आहे.या घटनांमधील साधर्म्य पाहता, ही एखादी संघटित टोळी असावी असा संशय व्यक्त केला जात आहे.सततच्या या घटनांमुळे शहरातील व्यापारी वर्गात दहशतीचे वातावरण आहे. नॅशनल इंजिनिअरिंग वर्कशॉपमधील घटनेचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले असून, पोलिसांनी त्या आधारे तपास सुरू केला आहे. या चोरट्यांचा तात्काळ बंदोबस्त करावा आणि रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

### महानगर प्रदेशात महिलांचा आर्थिक सहभाग वाढविण्यासाठी अभिनव प्रस्ताव

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** छत्रपती संभाजीनगरस्थित अर्बन रिसर्च फाउंडेशन आणि दिल्लीस्थित सेफटीपिन या संस्थांनी छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश प्राधिकरणाला महिलांचा आर्थिक सहभाग वाढविण्यासाठी एक अभिनव प्रकल्प प्रस्तावित केला आहे. महानगर प्रदेशात आगामी काळात होणाऱ्या औद्योगिक व शहरी विकासामध्ये महिलांचा सक्रीय सहभाग सुनिश्चित करण्यावर या प्रकल्पाचा भर आहे. विभागीय आयुक्त कार्यालयात याबाबत सादरीकरण करण्यात आले. यावेळी विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, महानगर नियोजनकार हर्षल बाविस्कर, तहसीलदार सुनंदा पारवे, साधना बांगर आदी उपस्थित होते.अर्बन रिसर्च फाउंडेशन ही टियर-२ आणि टियर-३ शहरांवर कार्य करणारी अग्रणी संस्था असून, सेफटीपिन ही राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक प्राप्त संस्था आहे. महानगर प्रदेशात येऊ घातलेल्या टोयोटा किर्लोस्कर, अथर यांसारख्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांमुळे निर्माण होणाऱ्या संधींमध्ये महिलांचा सहभाग कसा वाढविता येईल, तसेच त्याचा महाराष्ट्र व जिल्ह्याच्या आर्थिक उन्नतीस कसा हातभार लागेल, याबाबत सविस्तर माहिती यावेळी देण्यात आली.प्रस्तावित प्रकल्पामध्ये व्हिजन डॉक्युमेंट, प्रादेशिक विकास आराखडा (ठशसळेपरश्र झश्ररप) यांसारख्या भविष्यातील नियोजन प्रक्रियांमध्ये लिंगभाव-संवेदनशील (ऋशपवशी डशपीळींळीश) नियोजन दृष्टिकोनाचा समावेश करण्याची शिफारस करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्राच्या चौथ्या महिला धोरणासह विविध राष्ट्रीय व राज्यस्तरीय धोरणांमधून लिंगभावाचा अंतर्भाव कसा होत आहे व त्याचे महत्त्व काय आहे, याची माहिती प्रतिनिधींनी विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांना दिली.

### ५ आचार्यांचा गुरु मिलन सोहळा संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**/खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर, राजाबजार अंतर्गत सर्व मंदिर यांच्या सयुक्त विद्यमाने आज ५ आचार्यांचा गुरु मिलन सोहळा उत्साहत संपन्न सर्व प्रथम सकाळी ७.३० वा. बीडपाय पास देवळाई चौक येथून भव्य शोभायात्रा काढण्यात आली शोभायात्रमध्ये घोडे, उंट, रथ, बॅन्ड, लक्ष वेधत होते या वेळी सुमधुर बॅन्ड पथकांच्या सानिध्यात भाविक नृत्य सादर करत होते.पुरुषांनी हातात धर्मध्वजा व जयघोषाच्या घोषणा देत होते यामध्ये गुरुजी हमारे आये है नयी रोशनी लाये है, जियो और जिने दो, अशा घोषणा देवून संपुर्ण परिसर दणदणीत झाला होता. या वेळी गणधराचार्य आचार्य जगद् गुरु कुंन्थुसागर महाराज, राष्ट्र संत गुणधरनंदीजी महाराज, क्रांतिकारी आचार्य गुप्तीनंदी गुरुदेव, आचार्य सुर्यसागरजी गुरुदेव, राष्ट्र संत प्रणामसागर गुरुदेव, उपाध्याय विरंजन सागरजी महाराज यांची गळाभेट पाहून भाविकांचे डोळे पानावले यावेळी सौभाग्य मती माताजी ससघ उपस्थित होते यावेळी आचार्य कुंथुसागर महाराज यांचे सप्त दिवशी योग साधना शिवीर जाबींदा ग्राऊड येथे आगामन झाले यावे २७ जेसीबीच्या सहाय्याने आचार्यश्री वर पुष्प वृष्टी करण्यात आली यावेळी आचार्यश्री यांचे पाद प्रक्षालण राखी कोमल लोहाडे डॉ. तुषार लोहाडे अलका मगल पाटनी मूनीद्रजैन यानी कैले तसेच यावेळी उपस्थित हजारो भाविकांना संदिप कासलीवाल परिवार यांच्या वतीने प्रसादी वाटण्यात आली यावेळी कार्यक्रमाचे सुत्र संचालन व प्रास्तविक पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी व सचिव प्रकाश अजमेरा यांनी केले यावेळी विविध महीला मंडळांच्या वतीने आचार्यश्री यांची पुजा करण्यात आली यावेळी पुजेचे वाचन आचार्य गुणधरनंदी महाराज व आचार्य गुप्तीनंदी महाराज यानी कले तर शांतीमंत्राचे वाचन आचार्य कुंथुसागर महाराज यांनी केले.

# थंडीपासून बचाव करण्यासाठी वीटभट्टीचा आश्रय घेतला, पण धुराने घेतला घास; १७ वर्षीय तरुणाचा मृत्यू

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद (प्रतिनिधी)** कडाक्याच्या थंडीपासून बचाव करण्यासाठी वीटभट्टीच्या उबदारपणाचा आश्रय घेणे एका तरुण मजुराच्या जीवावर बेतले आहे. वीटभट्टीच्या धुरामुळे श्वास गुदमरून १७ वर्षीय दीपक देवसिंग मानघरे या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर त्याचा मित्र अमोल कचरू सौदागर हा गंभीर जखमी झाला आहे. ही हृदयद्रावक घटना खुलताबाद जवळील सुलीभंजन परिसरात शनिवारी (दि. १०) पहाटे उघडकीस आली.



नेमकी घटना काय?

सुलीभंजन परिसरात मोठ्या प्रमाणावर वीटभट्ट्या असून, मयत दीपक मानघरे (१७, रा. सुलीभंजन) आणि अमोल सौदागर (२१, रा. कसाबखेडा) हे दोघे मित्र दोन वेगवेगळ्या भट्ट्यांवर कामाला होते. शुक्रवारी (दि. ९) रात्री खुलताबाद येथे जेवण आटोपून ते दोघेही अमोल ज्या ठिकाणी कामाला होता, तिथे झोपण्यासाठी गेले.

रात्री थंडीचा कडाका वाढल्याने दोघांनी उब मिळवण्यासाठी पेटलेल्या वीटभट्टीचा आसरा घेतला आणि ते तिथेच झोपी गेले. मात्र, मध्यरात्री भट्टीतून निघणाऱ्या विषारी धुरामुळे दीपकचा श्वास गुदमरला आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. अमोललाही याचा त्रास झाला असून त्याला चक्कर येऊ लागल्याने तातडीने ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर अमोलला घरी सोडण्यात आले आहे.

परिसरात खळबळ आणि उलट-सुलट चर्चा

घटनेची माहिती मिळताच सुलीभंजन परिसरात एकच खळबळ उडाली. घटनास्थळी कोणत्याही वादाच्या खुणा किंवा संशयास्पद बाबी आढळून आल्या नाहीत, तरीही परिसरात या मृत्यूबाबत विविध चर्चांना उधाण आले होते. वीटभट्ट्यांमुळे आरोग्यास निर्माण होत असलेल्या धोक्याचा प्रश्नही या निमित्ताने ऐरणीवर आला आहे.

घटनेनंतर नातेवाईकांनी दीपकचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी (झीीं-र्गीशा) छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात नेण्याची मागणी केली. त्यानुसार मृतदेह घाटीत पाठवण्यात आला आहे.या प्रकरणी पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बीट जमादार शेख जाकीर व कॉन्स्टेबल किशोर गवळी या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

हिवाळ्यात बंद खोलीत किंवा भट्ट्यांजवळ शेकोटी पेटवून झोपणे जिवावर बेतू शकते. धुरातील 'कार्बन मोनोऑक्साइड' वायूमुळे गुदमरून मृत्यू होण्याचा धोका असतो, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# देगलूरच्या न्यायवैभवात मानाचा तुरा; अत्याधुनिक नूतन न्यायालयीन इमारतीचे दिमाखात उद्घाटन

**आत्ताच एक्सप्रेस**

**देगलूर (प्रतिनिधी)** देगलूर शहराच्या न्यायदानाच्या इतिहासात आजचा दिवस सुवर्णअक्षरांनी लिहिला जाणारा ठरला. १९२० पासूनची प्रदीर्घ आणि गौरवशाली परंपरा असलेल्या देगलूर येथील दिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर) व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग यांच्या नूतन, भव्य आणि अत्याधुनिक इमारतीचा लोकार्पण सोहळा आज मोठ्या उत्साहात पार पडला. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संदीपकुमार सी. मोरे यांच्या हस्ते या इमारतीचे उद्घाटन करण्यात आले.

अत्याधुनिक सुविधा आणि भव्यता

गेल्या अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेली ही इमारत आता न्यायदानासाठी सज्ज झाली आहे. जुन्या इमारतीच्या ऐतिहासिक जागेवरच ही नवीन वास्तू उभी राहिली असून, तीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे.प्रशस्त न्यायालयीन कक्षः न्यायाधीशांसाठी व पक्षकारांसाठी सुसज्ज खोल्या.सुसंस्कृत बार असोसिएशनः वकिलांसाठी स्वतंत्र आणि सर्व सोयींनी युक्त बैठक व्यवस्था. नागरी सुविधाः सामान्य नागरिकांसाठी पिण्याचे पाणी, प्रतीक्षा कक्षासह आवश्यक त्या सर्व सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुनील ग. वेदपाठक होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नीरज पी. धोटे यांची विशेष उपस्थिती होती. न्यायालयीन इमारत ही केवळ वीट-सिमेंटची रचना नसून ती न्याय, संविधान आणि लोकशाही मूल्यांचे जिवंत प्रतीक आहे, अशा भावना यावेळी मान्यवरांनी व्यक्त केल्या. देगलूरची ही वास्तू आगामी काळात न्यायाचा दीपस्तंभ ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

या सोहळ्याचे यशस्वी आयोजन करण्यासाठी दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) राघवेंद्र नरहरराव देव आणि देगलूर अभिवक्ता संघाचे अध्यक्ष ॲड. विरेंद्र नागनाथ पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या शिस्तबद्ध नियोजनामुळे हा ऐतिहासिक सोहळा अत्यंत देखणा आणि स्मरणीय झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नांदेड येथील दिवाणी




न्यायाधीश इंदूरकर यांनी प्रभावीपणे केले.

या सोहळ्याला प्रशासकीय अधिकारी आणि नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. यामध्ये:प्रशासकीय अधिकारी: उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत गोसावी, पोलीस निरीक्षक मारुती मुंडे.उपस्थिती: नांदेड, बिलोली व देगलूर येथील नामवंत विधीज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, नगरसेवक आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.या नवीन इमारतीमुळे आता पक्षकारांना अधिक गतीने आणि चांगल्या वातावरणात न्याय मिळण्यास मदत होणार आहे. देगलूरच्या वैभवात भर घालणाऱ्या या वास्तूचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# साखरपुड्याच्या मांडवातच शुभमंगल सावधान! सोयगावच्या 'आदर्श' शिक्षकाचा साध्या पद्धतीने आदर्श विवाह

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव/विजय पगारे/** आजच्या धावपळीच्या आणि प्रदर्शनाच्या युगात, जिथे लग्नसमारंभांवर लाखो रुपयांची उधळण केली जाते, तिथे सोयगाव येथील एका जिल्हा परिषद शिक्षकाने समाजसमोर एक वेगळाच आदर्श ठेवला आहे. जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, सोयगाव येथील आदर्श शिक्षक रामचंद्र महाकाळ यांचा साखरपुडा समारंभ रविवारी (दि. ११) पेडगाव (ता. सिल्लोड) येथे आयोजित करण्यात आला होता. मात्र, समाजातील ज्येष्ठ मंडळींच्या एका प्रस्तावामुळे या साखरपुड्याचे रूपांतर थेट विवाहात झाले आणि एका 'आदर्श' सोहळ्याची नोंद झाली.

प्रसंग साखरपुड्याचा, निर्णय लग्नाचा!

तिडका येथील माजी पोलीस पाटील रामचंद्र महाकाळ यांचा साखरपुडा पेडगाव येथील साईनाथ अंभोरे यांची कन्या शुभांगी यांच्याशी निश्चित झाला होता. रविवारी पेडगाव येथे दोन्ही कुटुंबांच्या उपस्थितीत साखरपुड्याचा कार्यक्रम सुरू होता. याच दरम्यान, उपस्थित ज्येष्ठ मंडळींनी साखरपुडा होतोय तर लग्नही आजच का उरकून घेऊ नये? असा प्रस्ताव दोन्ही बाजूंच्या पालकांकडे मांडला.वर पिता दिगंबर महाकाळ आणि वधू पिता साईनाथ अंभोरे यांनी या प्रस्तावाचा सकारात्मक विचार केला. विशेष म्हणजे, वर रामचंद्र महाकाळ आणि वधू शुभांगी यांनीही कोणतीही अट न ठेवता, साध्या पद्धतीने विवाह करण्यास त्वरित संमती दिली. त्यानंतर त्याच दिवशी संध्याकाळी हा विवाह सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

रामचंद्र महाकाळ हे सरकारी नोकरीत (शिक्षक) असूनही त्यांनी कोणत्याही प्रकारच्या झगमगाटाची किंवा मोठ्या खर्चाची अपेक्षा न ठेवता, अत्यंत साधेपणाने विवाह करून समाजातील सुशिक्षित तरुणांसमोर एक नवीन पायंडा



पाडला आहे. तिडका येथील महाकाळ परिवार आणि पेडगाव येथील अंभोरे परिवाराने घेतलेल्या या निर्णयाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.हा आदर्श विवाह यशस्वी करण्यासाठी अनेक मान्यवरांनी पुढाकार घेतला. यामध्ये:शिक्षण क्षेत्रातून: केंद्रीय शाळा सोयगावचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील, स्वामी दयानंद माध्यमिक विद्यालय तिडका येथील मुख्याध्यापक सुनील सरदार राजपूत,नातेवाईक व प्रतिष्ठित मंडळी: किसनदादा खंबाट, वधूचे वडील साईनाथ अंभोरे, काका भागवत अंभोरे, मामा दत्तू गवांडे (वाकी), वराचे वडील दिगंबर महाकाळ, दिगंबर जाधव, दिलीप क्षीरसागर, पुंडलिक कदम,या सर्वांच्या सहकार्याने आणि संमतीने 'आदर्श शाळेतील आदर्श शिक्षकाचा आदर्श विवाह' संपन्न झाला, अशीच भावना उपस्थित नागरिक व्यक्त करत आहेत.

# पिंपळवाडी पिराची येथे दोन दिवसीय इज्तेमा नियोजनबद्ध आणि शांततेत संपन्न; हजारो भाविकांची उपस्थिती

**आत्ताच एक्सप्रेस**

**पिंपळवाडी /प्रतिनिधी / हारून शेख/** तालुक्यातील पिंपळवाडी पिराची येथे आयोजित करण्यात आलेला दोन दिवसीय धार्मिक 'इज्तेमा' अत्यंत उत्साहात, शिस्तबद्ध वातावरणात आणि शांततेत संपन्न झाला. गेल्या अनेक दिवसांपासून या सोहळ्याची जय्यत तयारी सुरू होती, ज्याची सांगता यशस्वीरीत्या झाली.हा इज्तेमा यशस्वी करण्यासाठी पिंपळवाडी आणि परिसरातील शेकडो तरुणांनी आणि भाविकांनी स्वयंसेवक म्हणून दिवस-रात्र परिश्रम घेतले.



प्रशासकीय आणि व्यवस्थापकीय पातळीवर अतिशय कटिबद्ध पद्धतीने नियोजन करण्यात आले होते, ज्यामुळे मोठ्या संख्येने आलेल्या भाविकांना कोणताही त्रास झाला नाही.बाहेरून येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी आयोजन समितीच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती. यामध्ये प्रामुख्याने:वाहन पार्किंग: चारचाकी आणि दुचाकी वाहनांसाठी स्वतंत्र आणि प्रशस्त पार्किंगची व्यवस्था करण्यात आली होती, ज्यामुळे वाहतुकीची कोंडी झाली नाही. स्वच्छता व आरोग्य: भाविकांच्या सुविधेसाठी १०० तात्पुरती शौचालये उभारण्यात आली होती.वजुखाना: धार्मिक विधींसाठी ३०० हून अधिक वजुखान्यांची सोय करण्यात आली होती, जेणेकरून एकाच वेळी अनेक भाविकांना सुविधा मिळेल.निवास व भोजन: दूरवरून आलेल्या भाविकांसाठी राहण्याची आणि भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.या दोन दिवसांच्या काळात विविध धार्मिक विद्वानांनी मार्गदर्शन केले. 'मानवता, शांती आणि बंधुभाव' जपण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. संपूर्ण परिसरात पोलीस प्रशासन आणि स्थानिक स्वयंसेवकांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.कोणतीही अनुचित घटना न घडता, अत्यंत शिस्तप्रिय पद्धतीने हा सोहळा पार पडल्याने सर्वत्र आयोजन समितीचे कौतुक होत आहे. या इज्तेमामुळे परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

# टाळ-मृदंगाच्या गजरात कुक्कडगाव येथे श्रीमद् भागवत कथेची सांगता; भक्तिमय वातावरणाने पंचक्रोशी भारावली

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी**/अंबड तालुक्यातील कुक्कडगाव येथे आयोजित ११ व्या कीर्तन महोत्सव व श्रीमद् भागवत कथा सोहळ्याचा आज अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात समारोप झाला. ४ ते ११ जानेवारी २०२६ या कालावधीत चाललेल्या या धार्मिक महोत्सवामुळे संपूर्ण कुक्कडगावसह परिसरातील वातावरण अध्यात्ममय झाले होते.

घराघरांत पूजन आणि रांगोळ्यांची आरास

कथा समारोपाच्या दिवशी कुक्कडगावमध्ये अभूतपूर्व भक्तीचे दृश्य पाहायला मिळाले. गावातील प्रत्येक घरासमोर महिलांनी आकर्षक आणि रंगीबेरंगी रांगोळ्या काढल्या होत्या. चौरंग पाटाभोवती रांगोळ्या रेखाटून श्रीमद् भागवत ग्रंथाचे विधीपूर्वक पूजन करण्यात आले. दीप, फुले आणि अगरबत्तीच्या सुगंधाने संपूर्ण गाव पावन झाले होते. या सामूहिक पूजनातून गावातील भक्ती, श्रद्धा आणि संस्कारांचे दर्शन घडले.

साध्वी स्वाती दिदींच्या वाणीतून प्रवचन

या सोहळ्यात ह.भ.प. भागवताचार्य साध्वी स्वाती दिदी (शिष्या: भोले बाबा, सि. पिंपळगाव) यांनी आपल्या ओघवत्या आणि प्रभावी वाणीने श्रीमद् भागवत कथेचे निरूपण केले. त्यांनी आपल्या प्रवचनातून भक्ती, सदाचार, मानवता, कौटुंबिक संस्कार आणि सामाजिक सलोखा यांचा मोलाचा संदेश दिला. कथेच्या दररोजच्या सत्रात भाविकांची अलोट गर्दी पाहायला मिळत होती.



भव्य दिंडी आणि पुष्पवृष्टी

कथा समारोपानिमित्त सकाळी ९ ते १० या वेळेत गावातून श्रीमद् भागवत कथेची भव्य दिंडी काढण्यात आली. टाळ-मृदंगाचा गजर, हरिनाम संकीर्तन आणि जय जय रामकृष्ण हरी च्या जयघोषाने अवघे गाव दुमदुमले होते. महिला, युवक, वृद्ध आणि लहान मुलांनी या मिरवणुकीत मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. दिंडी मार्गावर ग्रामस्थांनी पुष्पवृष्टी करत आरती केली, ज्यामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

काल्याच्या कीर्तनाने सांगता

दिंडीनंतर सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. महंत महादेव महाराज गिरी (सराटी आंतरवाली) यांच्या काल्याच्या कीर्तनाने या धार्मिक सोहळ्याची अधिकृत सांगता झाली. महाराजांनी आपल्या कीर्तनातून भक्तीसह समाजप्रबोधनाचे विचार मांडले. कीर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते, ज्याचा लाभ हजारो भाविकांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने घेतला.

आयोजकांचे परिश्रम

हा भव्य सोहळा यशस्वी करण्यासाठी:शिवशक्ती गणेश मंडळ, कुक्कडगाव

ग्रामस्थ व महिला भजनी मंडळ,कुक्कडगाव व पंचक्रोशीतील भाविक

यांनी विशेष परिश्रम घेतले. आयोजकांच्या वतीने सर्व कीर्तनकार, कथाकार, संगीतकार आणि उपस्थित भाविकांचे आभार मानण्यात आले. या महोत्सवामुळे कुक्कडगावात भक्ती आणि संस्कारांची एक अविस्मरणीय आठवण निर्माण झाल्याची भावना भाविकांनी व्यक्त केली आहे.

## संक्षिप्त

### आजची युवा पिढी...

जगातील सर्वात तरुण जन देश जर कोणता असेल तर तो आपला भारत देश आहे. आज आपल्या देशाची लोकसंख्या १४४ कोटी इतकी आहे. आपल्या देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ६० टक्के लोकसंख्या ही १८ ते ४० या वयोगटातील आहे. या तरुणांमध्ये खूप ऊर्जा आहे. देशाचे भविष्य याच तरुणांवर अवलंबून आहे. याच तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत. माजी राष्ट्रपती ए पी जे अब्दुल कलाम यांचा तर तरुणांवर खूप विश्वास होता. तरुणच आपल्या देशाचे भाग्यविधाते आहेत असे ते म्हणत. या तरुणांकडे असलेल्या ऊर्जेचा उपयोग देशकार्यासाठी करुन घ्यावा असे त्यांचे मत होते. पण आज तरुणांसमोर अनेक आव्हाने आहेत. सर्वात मोठे आव्हान आहे ते बेरोजगारीचे. आजचे तरुण उच्चविद्याविभूषित आहेत. हुशार आहेत. ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, कला, क्रीडा, साहित्य अशा सर्वच क्षेत्रात आजचे तरुण अग्रेसर आहेत. देशासाठी काहीतरी करुन दाखवण्याची जिद्द त्यांच्याकडे आहे. शिक्षण आणि काम करण्याची उर्मी असूनही त्यांच्या हाताला रोजगार नाही. पदव्यांचे भेंडोळे घेऊन तरुण जागोजागी फिरत आहेत मात्र त्यांना नोकरी मिळत नाही. सरकारी नोकर भरती बंद आहे. खाजगी क्षेत्रात नोकरी मिळत नाही. ज्यांना आहे त्यांना नोकरी टिकवणे मुश्किल झाले आहे. स्वतःचा व्यवसाय, उद्योग करायचा म्हटले तर भांडवल नाही. शेतीही बेभरवशाची झाली आहे त्यामुळे आजचे तरुण हताश झाले आहेत. या हताश तरुणांना धीर देऊन त्यांना रोजगार देण्याऐवजी राजकीय नेते त्यांना पकोडे विका असे म्हणून त्यांच्या जखमेवर मीठ चोळत आहेत. रोजगार नसल्याने तरुणांमध्ये प्रचंड निराशा पसरली आहे. नैराश्यातून काही तरुणांनी आत्महत्येचा मार्ग स्वीकारला आहे तर काही तरुण व्यसनांच्या आहारी गेले आहेत. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याची स्वप्ने पाहत आहोत तोच तरुण रोजगार नसल्याने आपले जीवन अकाली संपवत आहे तर काही तरुण व्यसनांच्या आहारी जात आहेत हे पाहून मन खिन्न होते. रोजगार मिळत नसल्याने तरुणांच्या मनात व्यवस्थेविरुद्ध सुप्त असंतोष आहे. या असंतोषाचा भडका होण्याआधीच सरकारने तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी ठोस धोरण आखावे. जर या तरुणांच्या मनातील असंतोषाचा भडका झाला तर भल्याभल्यांना पळता भुई थोडी होईल. सध्याच्या बेरोजगारीचा दर हा मागील ४५ वर्षातील सर्वात जास्त आहे ही बाब आपल्या देशाला भूषणावह नाही. हा दर कमी करण्यासाठी आणि तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी सरकार काही ठोस प्रयत्नही करताना दिसत नाही. या तरुणाईचा वापर केवळ मते मिळवण्यासाठीच केला जात आहे असेच दुर्दैवाने म्हणावे लागेल. तरुणांच्या हाताला काम मिळणे ही काळाची गरज आहे कारण तरुणांच्या हाताला काम मिळाले नाही तर तरुणाई भरकटण्याची शक्यता अधिक आहे. त्यांच्या शिक्षणाचा, त्यांच्यातील ऊर्जेचा समाजाला, देशाला उपयोग होण्याऐवजी ती ऊर्जा वाया जाण्याचीच शक्यता अधिक आहे. या तरुणांच्या शिक्षणाचा व ऊर्जेचा देशकार्यासाठी उपयोग व्हायला हवा. त्यांचा उपयोग जर देशकार्यासाठी झाला तर आपल्याला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. आजची तरुणाई हीच आपली शक्ती आहे. या शक्तीचा वापर व्हायला हवा. जगात सर्वात जास्त तरुण भारतात आहे. जगात चिननंतर सर्वात जास्त लोकसंख्या भारतात आहे. खरंतर याला समस्या न मानता संधी मानली पाहिजे. या संधीचे सोने करुन तरुणांच्या हाताला रोजगार दिल्यास भारत महासत्ता बनेल यात शंका नाही. आजच्या तरुणांना जग सुंदर शांत असावे असे वाटते. गरिबी, भ्रष्टाचार त्यांना नको आहे. प्रजासत्ताक राष्ट्रावर त्यांची निष्ठा आहे. **-श्याम बसण्णा ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे**

# अंबड येथे शेकडो दिव्यांगांना मिळाले नवे 'बळ'

**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबड /प्रतिनिधी/** अंबड शहरातील 'समाजभान' सामाजिक संस्था आणि साधू वासवाणी मिशन (पुणे) यांच्या संयुक्त विद्यमाने एका अत्यंत स्तुत्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. राजमाता जिजाऊ, माता रमाई, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचे औचित्य साधून रविवारी (दि. ११ जानेवारी २०२६) मोफत कृत्रिम हात-पाय वितरण व रोपण शिबिर पार पडले. स्वामी समर्थ मंदिर सभागृह येथे झालेल्या या शिबिरात शेकडो दिव्यांगांना कृत्रिम अवयवांचे वाटप करून त्यांना आत्मनिर्भरतेची नवी उमेद देण्यात आली.

दिग्गजांच्या उपस्थितीत शिबिराचे उद्घाटन

या शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुनीलजी रायठ्ठा यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंबड नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सौ. देवयानीताई केदार कुलकर्णी होत्या. प्रमुख मार्गदर्शक म्हणून जालना येथील कलावती हॉस्पिटलचे संचालक डॉ. कृष्णा कोरडे, माजी आमदार विलासराव खरात आणि पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष जिगे यांची विशेष उपस्थिती होती.

केवळ अवयव नव्हे, तर स्वावलंबनाची भेट

या उपक्रमाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे केवळ कृत्रिम अवयव देणे हा नसून, दिव्यांग व्यक्तींना पुन्हा स्वतःच्या पायावर उभे करणे हा होता.



तज्ञ तंत्रज्ञांचे मार्गदर्शन: साधू वासवाणी मिशनच्या तज्ञांनी प्रत्येक लाभार्थ्याची बारकाईने तपासणी केली.दैनंदिन कामात सुलभता: वाटप करण्यात आलेले कृत्रिम अवयव हे चालणे, सायकल चालवणे, चढण चढणे आणि घरातील दैनंदिन कामे सहज करता येतील अशा दर्जाचे आहेत.नवे जीवनबळ: या मदतीमुळे अनेकांच्या चेहऱ्यावर हसू उमलले असून, समाजात सन्मानाने जगण्याची जिद्द निर्माण झाली आहे.

मान्यवरांचा गौरव आणि महिलांचा सन्मान

कार्यक्रमात नगरसेवक केदार दादा कुलकर्णी, गंगाधर वराडे, राहुल शहाणे, सौरभ कुलकर्णी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. विशेष म्हणजे 'जिजाई-रमाई-सावित्रीच्या लेकी' उपक्रमांतर्गत महिला नगरसेविकांचा सन्मान करण्यात आला. तसेच, जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करणारे 'आयर्नमॅन' डॉ. मुरलीधर जाधव यांचा विशेष गौरव करण्यात आला.

दर्पण दिनाचे औचित्य साधून शहरातील सर्व पत्रकार बांधवांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला शहरातील प्रतिष्ठित नागरिक, समाजसेवक आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

समाजातून कौतुकाचा वर्षाव

'समाजभान' संस्थेच्या वतीने करण्यात आलेले शिस्तबद्ध नियोजन आणि कार्यकर्त्यांच्या परिश्रमामुळे हे शिबिर यशस्वी झाले. एकाच छताखाली शेकडो दिव्यांगांना ही सेवा उपलब्ध करून दिल्याबद्दल अंबड तालुक्यात संस्थेच्या या कार्याचे मोठ्या प्रमाणावर कौतुक होत आहे.समाजातील वंचित घटकांसाठी 'समाजभान' नेहमीच तत्पर असून, आजच्या शिबिरामुळे अनेक बांधवांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण झाला आहे, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. - आयोजक, समाजभान सामाजिक संस्था.

## मुक्त विद्यापीठात तीन दिवसीय बहुविद्याशाखीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

नाशिक (प्रतिनिधी) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात 'समावेशक व समताधिष्ठित शिक्षण : नवीन शैक्षणिक धोरण - २०२० च्या परिप्रेक्ष्यात वैविध्यपूर्णतेसाठी शिक्षकांची सज्जता' या विषयावरील बहुविद्याशाखीय राष्ट्रीय परिषद तसेच कौन्सिल फॉर टीचर एज्युकेशन फाउंडेशन (उढएऋ - सीटीईएफ) यांच्या ३९ व्या वार्षिक परिषदेचे उद्घाटन दिल्ली येथील राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन आणि प्रशासन विद्यापीठ (छणएझ-) यांच्या कुलगुरू प्रा. शशिकला वंजारी यांच्या हस्ते झाले. विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखा व सीटीईएफ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ही तीन दिवसीय परिषद ८ ते १० जानेवारी २०२६ दरम्यान होत आहे. उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे होते.विद्यापीठाच्या शैक्षणिक इमारतीतील सभागृहात आयोजित या कार्यक्रमाच्या व्यासपीठावर डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ (पिंपरी-पुणे) चे कुलगुरू प्रा. एन. जे. पवार, सीटीईएफचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. के. एम. भांडारकर, सीटीईएफच्या आंतरराष्ट्रीय सचिव प्रा. नीलिमा भगवती, विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्य तथा शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या संचालिका डॉ. संजीवनी महाले तसेच निरंतर शिक्षण विद्याशाखेचे संचालक डॉ. जयदीप निकम यांची प्रमुख उपस्थिती होती.उद्घाटनपर भाषणात कुलगुरू प्रा. शशिकला वंजारी म्हणाल्या की, विकसित भारत - २०४७ चे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्यासाठी भारतीय शिक्षणपद्धती ही सर्वसमावेशक, समताधिष्ठित व निरंतर असणे आवश्यक आहे. भारताची सांस्कृतिक परंपरा, गुरु-शिष्य परंपरा आणि मूल्याधिष्ठित शिक्षण लक्षात घेऊन शिक्षणव्यवस्था विकसित झाली पाहिजे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० मध्ये यालाच प्राधान्य देण्यात आले आहे.

# डॉ. विजय खरात यांची लासूर स्टेशन धन्वंतरी डॉक्टर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड

**आत्ताच एक्सप्रेस**

**लासूर स्टेशन (प्रतिनिधी)**

गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथील वैद्यकीय क्षेत्रातील अग्रगण्य संघटना असलेल्या 'धन्वंतरी डॉक्टर्स असोसिएशन' च्या अध्यक्षपदी प्रसिद्ध वैद्यकीय व्यक्तिमत्व डॉ. विजय खरात यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. बुधवारी आयोजित करण्यात आलेल्या असोसिएशनच्या विशेष बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.



या बैठकीत डॉ. विजय खरात यांच्या नावाचा ठराव डॉ. विकास संगेकर यांनी मांडला, ज्याला डॉ. जीवन ताजी यांनी तात्काळ अनुमोदन दिले. असोसिएशनच्या सर्व सदस्यांनी या प्रस्तावाला एकमताने पाठिंबा दर्शवल्याने डॉ. खरात यांची निवड बिनविरोध झाली. मावळते अध्यक्ष डॉ. बन्सीलाल बंब यांनी नूतन अध्यक्षांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले आणि त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

अध्यक्ष निवडीसोबतच संघटनेच्या बळकटीकरणासाठी अन्य महत्त्वाच्या पदांचीही घोषणा करण्यात आली. यामध्ये कार्याध्यक्षपदी डॉ. अशोक ठोळे यांची निवड करण्यात आली आहे.या निवड प्रक्रिया प्रसंगी लासूर स्टेशन परिसरातील नामांकित डॉक्टरांची उपस्थिती होती, ज्यात प्रामुख्याने:

डॉ. सुभाष शिहरे, डॉ. संतोष साबळे, डॉ. भगवान गायके,डॉ. किशोर जगताप, डॉ. गोपाल धूत, डॉ. निलेश मुंदडा,डॉ. सागर सोनवणे, डॉ. तुषार विसपुते, डॉ. अनिल ठोळे,डॉ. राजेंद्र ठोळे, डॉ. मुकुंद चंडिले, डॉ. संदीप पाटील, डॉ. अब्दुल शेख,या निवडीनंतर बोलताना डॉ. विजय खरात यांनी सांगितले की, असोसिएशनच्या माध्यमातून डॉक्टरांचे प्रश्न सोडवण्यासाठी आणि आरोग्य सेवेचा दर्जा उंचावण्यासाठी मी कटिबद्ध राहीन. या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# स्वराज्याची संकल्पना प्रत्यक्षात उतरवणारी 'संस्कारांची जननी' : राजमाता जिजाऊ

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी**/ १२ जानेवारी हा दिवस महाराष्ट्राच्या मातीसाठी केवळ एक तारीख नसून, तो स्वाभिमान आणि स्वराज्याच्या प्रेरणेचा तेजस्वी दीपस्तंभ आहे. ज्या माऊलीने परकीय आक्रमकांच्या अंधकारात बुडालेल्या महाराष्ट्रात स्वराज्याचा सूर्य उगवण्याचे स्वप्न पाहिले आणि ते आपल्या पुत्राच्या माध्यमातून प्रत्यक्षात उतरवले, त्या राजमाता जिजाऊ माँसाहेब यांची आज जयंती. यानिमित्त त्यांच्या अलौकिक कार्याचा आणि त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर केलेल्या संस्कारांचा घेतलेला हा विशेष आढावा.

सिंदखेडराजा ते शिवनेरी: एक धगधगता प्रवास

राजमाता जिजाऊ यांचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा येथे लखुजीराव जाधव यांच्या पोटी झाला. बालपणापासूनच त्यांनी परकीय सत्तांचा अन्याय आणि रयतेची होणारी पिळवणूक जवळून पाहिली होती. अन्याय सहन करण्यापेक्षा तो मोडून काढण्याची जिद्द त्यांच्यात उपजतच होती. लग्नानंतर शहाजीराजांच्या साथीने त्यांनी हेच स्वप्न उराशी बाळगले आणि शिवनेरीवर बाल शिवबांना घडवताना त्याचे रूपांतर एका ध्येयात केले.



संस्कारांचे 'पहिले विद्यापीठ'

शिवनेरी किल्ल्यावर राजमाता जिजाऊंनी शिवाजी महाराजांना केवळ मायेची ऊब दिली नाही, तर त्यांना शौर्य, नीती आणि न्यायाचे धडे दिले. रामायण-महाभारतातील कथा सांगताना त्यांनी शिवाजी महाराजांच्या मनात अन्यायाविरुद्ध लढण्याची ठिणगी टाकली. त्या केवळ माता नव्हत्या, तर शिवरायांच्या पहिल्या 'गुरु' होत्या. त्यांनी शिवबांच्या हातात तलवार दिलीच, पण त्यासोबतच ती तलवार 'कोणासाठी' आणि 'कधी' वापरायची, याची विवेकबुद्धीही दिली.

**स्त्रीशक्ती आणि कुशल प्रशासनाचे प्रतीक**

राजमाता जिजाऊ या केवळ संस्कारांपुरत्या मर्यादित नव्हत्या, तर त्या एक कुशल प्रशासकही होत्या. शहाजीराजे मोहिमेवर असताना आणि शिवाजी महाराज स्वराज्याचा विस्तार करत असताना, अनेकदा पुणे परगण्याचा कारभार आणि न्यायनिवाड्याची जबाबदारी जिजाऊंनी समर्थपणे पेलली. 'कासारवाडीचा निवाडा' असो किंवा पुण्याचे पुनर्वसन, त्यांच्या दूरदृष्टीने स्वराज्याचा पाया भक्कम केला.

आजच्या काळातील प्रासंगिकता

आजच्या धावपळीच्या युगात आणि बदलत्या सामाजिक परिस्थितीत जिजाऊंचे विचार अधिक महत्त्वाचे ठरतात. महिला सक्षमीकरण, मातृत्वाची ताकद आणि राष्ट्रनिष्ठा यांचा आदर्श जिजाऊंनी जगासमोर ठेवला आहे. एक माता संपूर्ण राष्ट्राचे भवितव्य बदलू शकते, हे त्यांनी सिद्ध करून दाखवले. आजच्या पिढीने त्यांच्याकडून स्वाभिमान आणि नैतिकतेची शिदोरी घेणे हीच त्यांना खरी मानवंदना ठरेल.

**केवळ स्मरण नव्हे, तर संकल्पाचा दिवस!**

राजमाता जिजाऊंची जयंती साजरी करताना केवळ घोषणा न देता, त्यांच्या विचारांनुसार समाज घडवण्याचा संकल्प करणे आवश्यक आहे. स्त्रियांचा सन्मान, गोरगरिबांना न्याय आणि राष्ट्रप्रती कर्तव्यभावना हीच जिजाऊंची खरी शिकवण आहे.

# स्वच्छ व सुंदर जालना शहरासाठी भाजपला साथ द्या; माजी मंत्री बबनराव लोणीकर यांचे मतदारांना आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/**जालना शहर स्वच्छ, सुंदर आणि विकसित करणे हे आमचे मुख्य ध्येय आहे. शहरातील प्रत्येक नागरिकाच्या घरापर्यंत दररोज नियमित पाणीपुरवठा व्हावा, यासाठी जालना शहरातील मतदारांनी भारतीय जनता पक्षाच्या सर्व उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करून साथ द्यावी, असे आवाहन माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.

जालना महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत भाजप उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी शहराच्या प्रलंबित प्रश्नांवर भाष्य करत विकासाचा रोडमॅप मांडला.

'वॉटर ग्रीड' योजनेवरून महाविकास आघाडीवर टीका

आपल्या भाषणात लोणीकर यांनी पाणीपुरवठ्याच्या मुद्द्यावरून विरोधकांवर जोरदार निशाणा साधला. ते म्हणाले की, मी राज्याचा पाणीपुरवठा मंत्री असताना संपूर्ण महाराष्ट्रासाठी 'वॉटर ग्रीड' ही अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना आखली होती. या योजनेमुळे दुष्काळी भागाचा पाण्याचा प्रश्न कायमचा सुटणार होता. मात्र, २०१९ मध्ये उद्धव ठाकरे यांचे सरकार आल्यानंतर राजकीय आकसापोटी ही योजना बंद पाडण्याचे प्रयत्न झाले, ज्याचा फटका जनतेला बसला.

भाजपचा विकासाचा शब्द

लोणीकर यांनी मतदारांना विश्वास दिला की, जर जालना महानगरपालिकेत भाजपला सत्ता मिळाली तर नियमित पाणीपुरवठा: शहरातील प्रत्येक घरात दररोज शुद्ध पाणी पोहोचवले जाईल.स्वच्छता व सौंदर्य: कचरा व्यवस्थापन आणि आधुनिक




पायाभूत सुविधांद्वारे शहराचा चेहरामोहरा बदलला जाईल.मूलभूत सुविधा: रस्ते, वीज आणि आरोग्य सुविधांना प्राधान्य देऊन जालना हे एक 'मॉडेल शहर' म्हणून विकसित केले जाईल.या सभेला भाजपचे दिग्गज नेते आणि कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती. व्यासपीठावर आमदार संतोष पाटील दानवे, माजी आमदार व निवडणूक प्रमुख कैलासजी गोरंटचाल, भाजप महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, भाजप प्रदेश सचिव राहुलभैया लोणीकर, माजी जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, वसंतराव जगताप, बबनराव सिरसाठ यांसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.या सभेमुळे जालना शहरात निवडणुकीचे वातावरण अधिकच तापले असून, विकासाच्या मुद्द्यावर मतदारांना साद घालण्याचा प्रयत्न भाजपकडून केला जात आहे.

# पुराव्यांशी छेडछाड अंगलट: पुणे पोर्शे प्रकरणात 'पैशाच्या मस्तीने' गुंता वाढवला

**आत्ताच एक्सप्रेस**

**पुणे/ प्रतिनिधी/** पुण्यातील बहुचर्चित पोर्शे हिट अँड रन प्रकरणाने आता एक नवे वळण घेतले आहे. अपघातातील मूळ गुन्ह्यापेक्षा, तो गुन्हा दडपण्यासाठी आरोपींनी केलेली पुराव्यांची छेडछाड त्यांच्यासाठी अधिक घातक ठरली आहे. मुंबई उच्च न्यायालयाने जामीन नाकारल्यानंतर आता सर्वोच्च न्यायालयाने आरोपी आशिष मित्तल आणि आदित्य सूद यांच्या जामीन अर्जावर नोटीस बजावली आहे.

या प्रकरणात सुरुवातीला केवळ अपघाताचा गुन्हा होता, परंतु आरोपींनी पैशाच्या जोरावर आणि सत्तेच्या प्रभावाखाली पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला. जर त्यांनी कायद्याच्या प्रक्रियेत अडथळे आणले नसते, तर कदाचित त्यांना कायदेशीर चौकटीत कमी शिक्षा झाली असती. मात्र, रक्ताचे नमुने बदलणे आणि बनावट कागदपत्रे तयार करणे यांसारख्या कृत्यांमुळे हे प्रकरण अधिक गंभीर आणि गुंतागुंतीचे बनले आहे.तपासात असे समोर आले आहे की, अपघाताच्या वेळी गाडीतील अल्पवयीन मुलांनी मद्यपान केले होते. हे लपवण्यासाठी एका संघटित कटाद्वारे रक्ताच्या नमुन्यांची अदलाबदल करण्यात आली.आशिष मित्तल आणि आदित्य सूद: यांच्यावर स्वतःचे रक्ताचे नमुने अल्पवयीन मुलांच्या नमुन्यांशी बदलल्याचा आरोप आहे. विशाल अग्रवाल (पिता): मुख्य आरोपी मुलाचा बाप, ज्याने हा संपूर्ण कट रचल्याचा आरोप आहे. डॉ. अजय तावरे आणि डॉ. श्रीहरी हाळनोर: ससून रुग्णालयातील या डॉक्टरांनी पैशाच्या आमिषापोटी रक्ताचे नमुने बदलले.अश्पाक मकंदर आणि अमर गायकवाड: यांनी या व्यवहारात मध्यस्थ म्हणून भूमिका बजावली.या सर्वांवर भारतीय दंड संहिता (IPC) आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत बनावटगिरी, लाचखोरी आणि पुरावे नष्ट करण्याचे गंभीर गुन्हे दाखल आहेत.१६ डिसेंबर २०२५ रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्याम चांडक यांनी आठही आरोपींचे जामीन अर्ज फेटाळले होते. न्यायालयाने आपल्या निकालात अत्यंत कठोर निरीक्षणे नोंदवली:हा केवळ अपघात नसून, अल्पवयीन आरोपीला वाचवण्यासाठी रचलेला एक संघटित गुन्हेगारी कट आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अ‍ॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813